मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शहरातील "इको टुरिझम पार्क" च्या कामाला गती!

## राज्याचे वन मंत्री गणेश नाईक यांचे आश्वासन : आमदार महेश लांडगे यांचा पाठपुरावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील पर्यटन क्षेत्राला चालना देणारा आणि शहराच्या वैभवात भर घालणारा मौजे डुडुळगाव येथील प्रस्तावित "इको टुरिझम पार्क" च्या कामाला गती देण्यात येणार आहे. त्यासाठी राज्याच्या वन विभागाकडून तातडीने निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असे आवाश्वासन राज्याचे वन मंत्री गणेश नाईक यांनी दिली.



वन विभागाशी संबंधित विविध मागण्यांसाठी वन मंत्री नाईक यांनी सविस्तर बैठक घ्यावी, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली होती. त्यानुसार, पुण्यात शुक्रवारी बैठक झाली. यावेळी महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, शोमिता विश्वास, नरेश झुरमुरे, विवेक खाडेकर, महादेव मोहिते असे विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी आमदार लांडगे यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील मौजे डुडुळगाव येथे राज्य सरकारच्या वन विभागाच्या माध्यमातून "इको टुरिझम पार्क" विकसित करण्यात येणार आहे. यासाठी निधी उपलब्ध व्हावा. तसेच, आण्णाभाऊ साठेनगर वसाहतीसाठी पायाभूत सुविधा उभारणीसाठी परवानगी मिळावी. मंजूर विकास योजनेतील रस्त्यासाठी भूखंड हस्तांतरण आणि मौजे मोशी, गट क्र. ६४६ मधील प्रस्तावित २२०/३३ के.व्ही. उपकेंद्रासाठी अभिप्राय मिळावा, अशी मागणी केली.

डुडुळगाव येथील वन विभागाच्या मालकीच्या भूखंडावर "इको टुरिझम पार्क" उभारण्याचा प्रस्ताव आहे. सदर प्रकल्पासाठी अंदाजे 2.62 कोटी रुपये निधीची आवश्यकता असून, तो वन विभाग तसेच जिल्हा वार्षिक योजना 2025-26 अंतर्गत मागविण्यात आलेला आहे. संबंधित प्रस्ताव सध्या प्रलंबित आहे. या प्रकल्पाच्या त्वरित अंमलबजावणीसाठी आवश्यक निधी उपलब्ध होणार आहे.

> "'इको टुरिझम पार्क'साठी तात्काळ निधी उपलब्ध करण्यात येईल. महानगरपालिकेच्या प्रस्तावांतर आगामी 15 दिवसांत निर्णय घेण्यात येईल, तसेच आण्णाभाऊ साठेनगर वसाहतीसाठी पायाभूत सुविधा उभारणीसाठी वन विभागाचा अडथळा येणार नाही, असे आश्वासन वन मंत्री गणेश नाईक यांनी दिले आहे. त्यामुळे वन विभागाशी संबंधित कामांना गती मिळेल, असा विश्वास आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

---

# नागरी समस्या सोडवण्याच्या दृष्टीने नियोजन करा!

## राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांनी घेतली पीएमआरडीएमध्ये आढावा बैठक

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे शहर परिसरात नागरी समस्या दिवसेंदिवस वाढत असून त्या सोडवण्याच्या दृष्टीने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने नियोजन करावे, असे निर्देश राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांनी दिले. गुरुवारी (दि.२६) पीएमआरडीए कार्यालयात त्यांनी आढावा बैठक घेतली. यावेळी महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी पीएमआरडीएअंतर्गत सुरू असलेल्या तसेच प्रस्तावित विकास कामांबद्दल त्यांना सविस्तर माहिती दिली.




नागरी सुविधा आणि वाहतूक कोंडीमुळे पुणेकर हैराण आहे. त्यामुळे या समस्येकडे अधिक लक्ष देण्याची गरज असल्याचे राज्यमंत्री मिसाळ यांनी बैठकीत स्पष्ट केले. त्या अनुषंगाने महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, मुख्य अभियंता रिनाज पठाण यांनी सध्या सुरू असलेल्या विविध विकास कामांसह मिसिंग लिंक, औद्योगिक कनेक्टिव्हिटी, पर्यटन व धार्मिक स्थळांचा विकास, अर्बन ग्रोथ सेंटर, रिंग रोड कनेक्टिव्हिटी यासह विविध भागात सुरू असलेल्या रस्ते विकास कामांसह इतर प्रकल्प आणि योजनांबाबत राज्यमंत्री यांना सविस्तर माहिती दिली.

पुणे शहराच्या पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी आखण्यात आलेल्या विविध योजना, रस्ते विकासाचे नियोजन, गत काही वर्षांत राबविण्यात आलेल्या प्रकल्पांची सध्यस्थिती तसेच पुणे रिंग रोडच्या प्रगतीवर चर्चा झाली. शहरातील विविध भागांत प्रभावी कनेक्टिव्हिटी निर्माण करण्यासह मुख्यमंत्री - 100 दिवसांच्या उद्दिष्टांच्या यशस्वी साध्यतेसह पुढील 150 दिवसांच्या कार्यक्रमाचे नियोजन व त्यातून साध्य होणाऱ्या उद्दिष्टांवरही यावेळी चर्चा करण्यात आली.

या बैठकीला पीएमआरडीएचे अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला, पोलीस अधीक्षक तथा दक्षता अधिकारी अमोल तांबे, विकास परवानगी व नियोजन विभागाचे संचालक सुनील मरळे, मुख्य अभियंता रिनाज पठाण, सह आयुक्त पूनम मेहता, वित्तीय नियंत्रक पद्मश्री तळदेकर यांच्यासह सर्व विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# हिंजवडी आयटी पार्कमधील कोंडी अखेर सुटणार!

## पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून एमआयडीसीला भूसंपादनाचे निर्देश

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कमधील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यात सरकारी लाल फितीचा अडसर अखेर दूर झाला आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) आयटी पार्कमधील उड्डाणपुलासह पर्यायी रस्त्यांच्या सुमारे ६५० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे नियोजन केले आहे. या प्रकल्पांच्या भूसंपादनासाठी एमआयडीसीने तातडीने जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी दिले.




हिंजवडी, माण, म्हाळुंगे आणि मारूंजी येथील प्रकल्पांसाठी भूसंपादनाची जबाबदारी सहा महिन्यांत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आधी 'एमआयडीसी' आणि नंतर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे (पीएमआरडीए) देण्यात आली. या गोंधळामुळे आयटी पार्कमधील प्रकल्प कागदावरच राहिले होते. त्यामुळे हिंजवडी आयटी पार्कमधील वाहतूककोंडीची समस्या दिवसेंदिवस बिकट होत आहे. या पार्श्वभूमीवर पीएमआरडीए आयुक्त डॉ. म्हसे यांनी शासकीय यंत्रणा, आमदार शंकर मांडेकर आणि संबंधित शेतकऱ्यांची संयुक्त बैठक घेतली.

माण रस्त्यासह इतर काही महत्त्वाच्या रस्त्यांसंदर्भात एमआयडीसीकडून भूसंपादनाची प्रक्रिया रखडल्याने वाहनधारकांसह नागरिकांना या मार्गावरून प्रवास करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे संबंधित मार्गादरम्यान किती शेतकऱ्यांच्या जमिनीचे संपादन आवश्यक आहे, यासंबंधी तातडीने अहवाल तयार करत तसा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास पाठवत तातडीने भूमी अभिलेख विभागाकडून मोजणी करून घेण्याचे निर्देश डॉ. म्हसे यांनी एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना दिले.

या भूसंपादन प्रक्रियेदरसंबंधी संबंधित शेतकऱ्यांचे म्हणणे जाणून घेत त्यांना नियमानुसार विकास हक्क हस्तांतरण (टीडीआर) अथवा भूसंपादनाचा मोबदला द्यावा लागणार आहे. यादरम्यान शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचे निराकरण प्रशासकीय यंत्रणेमार्फत करण्यात आले. आगामी काळात या भागातून ४५ मीटर रस्त्याची आखणी होणार असल्याने गावालगतची अनेक घरे बाधित होतील. त्यामुळे गाव हद्दीत ४५ मीटर ऐवजी २४ मीटरचे रस्ते करावेत, अशी मागणी यावेळी शेतकऱ्यांनी केली.

### शेतकऱ्यांना टीडीआर

» हिंजवडी-माण मुख्य रस्त्याच्या रुंदीकरण प्रकल्प आणि जमीन भूसंपादनाशी संबंधित शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर या बैठकीत जमिनीच्या टीडीआर प्रक्रियेतील अडचणी, भूखंडांच्या योग्य मूल्यांकनाबाबतच्या अपेक्षा, तसेच नुकसानभरपाई संदर्भातील तक्रारी यावर चर्चा करण्यात आली. रस्ते रुंदीकरण प्रकल्पाच्या प्रक्रियेमुळे कोणत्याही शेतकऱ्याला आर्थिक किंवा सामाजिक नुकसान होणार नाही, याची संबंधित अधिकाऱ्यांनी खात्री करूनच पुढील प्रक्रिया करावी, असे निर्देश महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी दिले.

### आयटी पार्कमधील प्रकल्प

लक्ष्मी चौकातील उड्डाणपूल
लांबी : ७२० मीटर
खर्च : ४० कोटी रुपये

शिवाजी चौक ते स्मशानभूमी सहापदरी रस्ता
लांबी : ९०० मीटर
खर्च : २४.७४ कोटी रुपये

आयटी पार्क टप्पा एक ते टप्पा तीन नवीन रस्ता
लांबी : ५ किलोमीटर
खर्च : ५८४.१४ कोटी रुपये

# आषाढी एकादशीनिमित्त आणखी तीन विशेष रेल्वे

## मध्य रेल्वेच्या पुणे विभागातून तीन एकेरी अतिरिक्त आषाढी रेल्वे सोडण्याचे नियोजन

**पुणे | प्रतिनिधी**

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरमध्ये जाणाऱ्या भाविकांसाठी मध्य रेल्वेच्या पुणे विभागातून पुणे ते मिरज, मिरज ते नागपूर आणि मिरज ते लातूर या तीन एकेरी अतिरिक्त आषाढी रेल्वे सोडण्याचे नियोजन केले आहे. त्याचबरोबर विविध स्थानकांवरून सध्या ८३ आषाढी विशेष गाड्या धावत आहेत, अशी माहिती रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली.



मध्य रेल्वेकडून आषाढी एकादशीचे औचित्य साधून दर वर्षी अतिरिक्त गाड्या सोडल्या जातात. अनेक भाविक रेल्वेने पंढरपूरला जातात, तर काही भाविक, पालखी सोहळा ज्या ठिकाणी पोहचला आहे, तेथून वारीत दाखल होतात. यंदा मध्य रेल्वेच्या विविध स्थानकांवरून ८३ आषाढी विशेष रेल्वे सोडण्यात आल्या आहेत. आता मध्य रेल्वे नव्याने आणखी तीन अतिरिक्त विशेष आषाढी रेल्वे सोडणार आहे.

### कोणत्या मार्गावरून गाड्यांचे नियोजन ?

**पुणे – मिरज विशेष रेल्वे**

गाडी क्रमांक ०१४१३ : ही विशेष एकेरी रेल्वे ८ जुलै रोजी सकाळी ७ वाजता पुणे स्थानकावरून निघेल आणि दुपारी १२.३० पर्यंत मिरज स्थानकापर्यंत पोहचेल. ही गाडी लोणंद, सातारा, कराड, किर्लोसकरवाडी आणि सांगली अशी धावेल.

**मिरज-नागपूर विशेष रेल्वे**

गाडी क्रमांक ०१२१३ : ही विशेष एकेरी रेल्वे ८ जुलै रोजी मिरज स्थानकातून दुपारी १२.५५ वाजता निघेल आणि दुसऱ्या दिवशी १२.३० वाजता नागपूरला पोहचेल. आगर, कवठे महाकाळ, धालगाव जठ रस्ता, म्हसोबा डोंगरगाव, सांगोला, पंढरपूर, कुर्डूवाडी, दौंड, अहिल्यानगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, चाळीसगांव, जळगांव, भूसावळ, मलकापूर, शेगांव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, पंढरगाव, चांदणगांव या मार्गे धावेल.

**मिरज – लातूर एकेरी अनारक्षित रेल्वे**

गाडी क्रमांक ०१४०९ : ही विशेष रेल्वे ६ जून रोजी सकाळी ९ वाजता मिरज स्थानकावरून निघेल आणि त्याच दिवशी रात्री ७.२० वाजता लातूर स्थानकात पोहचेल. आगर, कवठे महाकाळ, धालगांव, सांगोला, पंढरपूर, मोडलिंब, कुर्डूवाड, शेंद्री, बार्शी, पांगरी, धाराशिव, येडशी, कळंब, ढोकी, मुरूड, औसा रस्ता आणि हरंगुळ असा गाडीचा मार्ग असले.

> पुणे रेल्वे स्थानकावरून ८ जुलै रोजी आषाढी एकादशीनिमित्त विशेष रेल्वे सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. दोन वातानुकूलित डबे, १० आरामदायी, द्वितीय श्रेणीतील दोन आणि चार सामान्य अशी गाडीच्या डब्यांची रचना असणार आहे. भाविक, वारकऱ्यांना इच्छितस्थळी जाण्यासाठी ऑनलाईन आरक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.
>
> **- हेमंतकुमार बेहरा, जनसंपर्क अधिकारी, मध्य रेल्वे, पुणे विभाग.**

# १ जूलैपासून थकबाकी करावर मनपा घेणार २ टक्के व्याज...!

## महापालिकेने ३० जून पर्यंत विविध कर सवलती जाहीर केल्या आहेत. आतापर्यंत सव्वा तीन लाख नागरिकांनी सवलतींचा लाभ घेतला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील मालमत्ता धारकांसाठी महापालिकेने ३० जून २०२५ पर्यंत विविध कर सवलती जाहीर केल्या आहेत. आतापर्यंत सव्वा तीन लाख नागरिकांनी सवलतींचा लाभ घेतला आहे. आता या सवलतींचा लाभ घेण्यासाठी अवघे पाच दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे १ जूलैनंतर थकबाकी करावर महापालिकेकडून अतिरिक्त २ टक्के विलंब शुल्क आकारण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी चालू आर्थिक वर्षातील तसेच थकीत कर भरावा, असे आवाहन महापालिकेकडून केले आहे.

महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने मालमत्ता धारकांसाठी ३० जून २०२५ पर्यंत संपूर्ण कराचा भरणा ऑनलाइन स्वरूपात केल्यास १० टक्के सवलत व कुटुंबातील महिलेच्या नावावर असलेल्या एका निवासी मालमत्तेवर ३० टक्क्यांपर्यंत सूट देण्यात येत आहे. यासोबतच, आतापर्यंत ३२ हजार ५०५ थकबाकीदारांना जप्तीपूर्वीची नोटीस देखील बजाविण्यात आली आहे.

तसेच ज्या मालमत्ताधारकांनी धनादेशाद्वारे कराचा भरणा केला, परंतू त्यांचे धनादेश वटले नाहीत, अशा मालमत्तांवर लवकरच जप्तीची कारवाई केली जाणार आहे. यामध्ये न वटलेल्या धनादेशांची एकूण रक्कम ९ कोटी १५ लाख रुपये इतकी असून मालमत्ताधारकांनी ३० जूनपूर्वी आपला मालमत्ता कर ऑनलाईन किंवा रोख स्वरूपात भरावा, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

करसंकलन विभागाने कर वसुलीसाठी विविध माध्यमातून जनजागृती केल्याने आतापर्यंत सुमारे १९ हजार ६५१ थकबाकीदारांकडून ४० कोटी ३३ लाखांचा करसंकलीत झाला आहे. त्यासोबतच ऑनलाइन कर भरणाऱ्यांची संख्या देखील मोठ्या प्रमाणात वाढली आहे.




### ४०८ कोटींचा कर जमा..

» १ एप्रिल २०२५ पासून आतापर्यंत सुमारे ३ लाख १८ हजार मालमत्ताधारकांनी आपला कर भरून विविध सवलतींचा लाभ घेतला आहे. यामुळे चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत तब्बल ४०८ कोटी ७३ लाख रुपयांचा कर संकलित झाला आहे. यामध्ये १० टक्के सवलतीचा लाभ घेणाऱ्या मालमत्ताधारकांची संख्या जवळपास २ लाख ३२ हजार ७६ असून त्यांनी ऑनलाईन भरणा केलेल्या कराची रक्कम २४६.१८ कोटी आहे.

### विविध उपक्रमातून जनजागृती..

» कर वसूल करण्यासाठी विभागाच्या वतीने एसएमएस, कॉलिंग, जनजागृती, होर्डिंग आणि समाज माध्यमे यामधून मोठ्या प्रमाणात प्रचार व जनजागृती करण्यात येत आहे. तसेच अद्यापही ज्या थकबाकीदारांनी मालमत्ता कर भरलेला नाही, त्यांच्यावर लवकरच जप्ती अधिपत्र बजावण्यात येणार असल्याचेही विभागाने स्पष्ट केले आहे. तसेच अशा थकबाकीदारांवर केव्हाही जप्तीची कारवाई केली जाऊ शकते. यामध्ये निवासी मालमत्ताधारकांचे वाहन, टीव्ही, फ्रिजसारख्या वस्तू जप्त करण्यात येणार असल्याचे कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांनी सांगितले.

“ पिंपरी चिंचवड शहरातील करदात्यांनी सवलत योजनेस उत्तम प्रतिसाद दिला असून सवलतीचा लाभ घेतला आहे. परंतू अद्यापही ज्या मालमत्ताधारकांनी कराचा भरणा केला नाही, अशा मालमत्ताधारकांना सवलत घेण्याची शेवटची संधी आहे. त्याबरोबरच जे या तिमाहीमध्ये कराचा भरणा करणार नाहीत, अशा मालमत्ताधारकांच्या करावर पुढील महिन्यापासून २ टक्के विलंब दंड लागू होणार आहे. थकबाकीदारांच्या मालमत्ता सुध्दा जप्त करण्याची मोहिम हाती घेण्यात येणार आहे. नागरिकांनी तात्काळ कराचा भरणा करुन सवलतीचा लाभ घ्यावा.

**- प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# साथीचे आजार रोखण्यासाठी महापालिकेकडून ‘ब्रेक द चेन’ मोहीम...

## प्रतिबंधात्मक उपाय, जनजागृती, स्वच्छता आणि नागरिकांच्या सहभागातून डास निर्मूलन होणार....

**पिंपरी | प्रतिनिधी**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर डेंगी, मलेरिया आणि चिकन गुणिया यांसारख्या साथीचे आजारांचा प्रादुर्भाव वाढत आहे. तो रोखण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेतर्फे ‘ब्रेक द चेन’ ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. या माध्यमातून प्रतिबंधात्मक उपाय, जनजागृती, स्वच्छता आणि नागरिकांच्या सहभागातून डास निर्मूलन करण्यात येणार आहे.

राज्य शासनाच्या डेंग्यू प्रतिबंधात्मक धोरणानुसार ‘तपासा, स्वच्छ ठेवा आणि झाका’ ही त्रिसूत्री प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. याअंतर्गत प्रत्येक नागरिकाने आपल्या आजूबाजूच्या परिसरात साचलेले पाणी तपासणे, दर आठवड्याला टाक्या व पाणी साठवणाऱ्या भांड्यांची स्वच्छता करणे आणि पाणी साठवणारी भांडी झाकून ठेवणे आवश्यक आहे.

जनजागृतीसाठी व्याख्याने, रॅली, पोस्टर स्पर्धा, पथनाट्य, सोशल मीडिया व्हिडिओ आणि एलईडी स्क्रिनद्वारे माहितीप्रसार या सर्व माध्यमांचा प्रभावी वापर करण्यात येणार आहे. सामाजिक संस्थांच्या मदतीने चर्चासत्र, परिसंवाद आणि जनजागृतीपर कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. या मोहिमेची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होण्यासाठी नोडल वैद्यकीय अधिकारी, सहाय्यक आरोग्य अधिकारी, कीटकनाशक निरीक्षक अशा अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या ८ विशेष पथकांची नियुक्ती केली आहे. ही पथके शहरभर डेंगीप्रतिबंधक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यासाठी कार्यरत राहणार आहेत.

ही उपाययोजना सर्वांनी केल्यास डेंगीच्या प्रसाराला प्रतिबंध करता येईल. याच अनुषंगाने महापालिकेने या मोहिमेला अधिक परिणामकारक बनवण्यासाठी ‘ब्रेक द चेन’ मोहीम हाती घेतली आहे. नागरिकांनी डेंगीविरोधात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे



### निरोगी आरोग्याची पंचसूत्री...

» डास उत्पत्तीची ठिकाणे शोधा व नष्ट करा, स्वतःचे डासांपासून संरक्षण करा, फॉगिंग व कीटकनाशक फवारणीस सहकार्य करा, ताप व इतर लक्षणे आढळल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि पुरेसे पाणी प्या, शरीराचे द्रवपातळी संतुलित ठेवा, ही पाच सूत्रे लक्षात घेऊन शहरातील प्रत्येकाने उपाययोजना अमलात आणाव्यात, असे आवाहन पालिकेने केले आहे.

“ "शहराच्या आरोग्यासाठी प्रशासन, वैद्यकीय विभाग, समाज आणि नागरिक एकत्रितपणे कार्यरत राहिले तर डेंगीसह सर्व कीटकजन्य व जलजन्य आजारांवर नियंत्रण मिळवणे शक्य आहे. ‘ब्रेक द चेन’ ही मोहीम प्रत्येक पिंपरी-चिंचवडकराची जबाबदारी आहे. त्यामुळे प्रत्येकाने यात सहभागी होणे प्रत्येकाची जबाबदारी आहे."

**- डॉ. लक्ष्मण गोफणे, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका.**

# पुरंदर विमानतळप्रकल्प भूसंपादनासाठी जोरदार हालचाली

## शेतकऱ्यानी आपली भूमिका वेळोवेळा जाहीर केली आहे, मात्र शेतकऱ्याना विश्वासात न घेता त्यांचा विरोध डावलून भूसंपादनाची प्रक्रिया सुरुच ठेवली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यात शासनाच्या वतीने येणाऱ्या विमानतळ प्रकल्पास स्थानिक शेतकऱ्यांचा कडाडून विरोध आहे. याबाबत शेतकऱ्यांनी आपली भूमिका वेळोवेळा जाहीर केली आहे. मात्र शेतकऱ्यांना विश्वासात न घेता त्यांचा विरोध डावलून भूसंपादनाची प्रक्रिया सुरूच ठेवली आहे. सध्या आषाढी वारी सुरु असल्याने अनेक शेतकरी वारीत सहभागी झाले आहेत. मात्र त्यांच्या अनुपस्थितीत अधिकारी मनमर्जीपणे प्रक्रिया राबवीत असल्याचे दिसत आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात एका बैठकीचे आयोजनही करण्यात आले होते. मात्र ऐनवेळी बैठक रद्द करून अधिकाऱ्यांनी आपल्या बुद्धिमत्तेचे प्रदर्शन घडविले आहे.

आता स्थानिक तालुका प्रशासनाकडे शेतकऱ्यांची बऱ्यापैकी माहिती संकलित झाल्याने पुढील काळात थेट बांधावरील सर्व्हेला सुरुवात करण्याचे शासनाचे धोरण आहे. त्यादृष्टीने शासनाची तयारी सुरू आहे. मात्र सध्या आषाढी वारी सुरु असून संत सोपानदेव महाराज आणि संत चांगा वटेश्वर महाराजांचे पालखी सोहळे सासवडमधून पंढरपूरला निघाले आहेत. या दोनही सोहळ्यात विमानतळ प्रकल्पबाधित गावचे अनेक शेतकरी सहभागी झाले आहेत. तसेच मागील सुनावणी सुरु असताना वारीच्या काळात शेतकरी उपस्थित राहू शकत नसल्याने शासनाचा विमानतळबाबत कोणताही कार्यक्रम घेवू नये असे सांगितले होते.

शेतकऱ्यांनी भूसंपादन अधिकाऱ्यांना वेळोवेळी सहकार्य करून योग्य ती माहितीही दिली आहे. अधिकारी मात्र शेतकऱ्यांची भूमिका योग्य पद्धतीने शासनापर्यंत पोहोचवीत नाहीत असे एकंदरीत दिसून येत आहे त्यामुळेच शेतकरी आणि अनेक गावांचे सरपंच, सदस्य वारीत सहभागी असताना एकेक निर्णय जाहीर करण्याची घाई करण्यात येत आहे.

एवढेच नसून अधिकाऱ्यांचा एकमेकांशी विसंवाद असल्याचे दिसत आहे. कारण संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत सोपानदेव महाराज यांचे पालखी सोहळे अद्याप पुरंदर तालुक्यातच असून तालुक्याचे संपूर्ण प्रशास न वारीच्या कामात व्यस्त असून या बैठकीला पुरंदरच्या प्रांताधिकारी वर्षा लांडगे, तहसीलदार विक्रम राजपूत, कृषी अधिकारी सुरज जाधव त्याचबरोबर संबंधित गावांचे सरपंच, उपसरपंच, सदस्य आणि ग्रामसेवक यानाही उपस्थित राहण्याच्या सूचना होत्या.



### सर्व्हे प्रलंबित ठेवला होता

» सुनावणीच्या काळात प्रशासनाने शेतकऱ्यांकडून प्रत्येक जमिनीचे गट नंबर पासून किती क्षेत्र, शेतातील पिके, फळबागा, विहीर, पाइपलाइन, मोटर, शेतीपूरक व्यवसाय घरांची अद्ययावत माहिती संकलित केली आहे. तसेच त्यावर कोणतेही उत्तर न देता वरिष्ठ कार्यालयाकडे माहिती पाठवून दिली जाईल एवढेच मोघम उत्तर शेतकऱ्यांना मिळाले आहे. मात्र त्याचवेळी शासनाने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पुन्हा एकदा अंतिम सर्व्हे करण्याची जोरदार तयारी केली आहे. त्यादृष्टीने जिल्हाधिकाऱ्यांनी तालुका कृषी अधिकाऱ्यांच्या मदतीने सर्व्हे करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत. मात्र सुनावणी सुरू असल्याने सर्व्हे प्रलंबित ठेवण्यात आला होता.

### आम्हाला विमानतळ प्रकल्प नकोच

» पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, कुंभारवळण, पारगाव, एखतपूर मुंजवडी, खानवडी अशा सात गावात शासनाचा विमानतळ प्रकल्प प्रस्तावित असून यासाठी 2832 हेक्टर जमीन संपादित करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. मागील काही दिवसापूर्वी शेतकऱ्यांनी शासनाच्या ड्रोन सर्व्हेला विरोध केला होता. त्यानंतर शासनाने शेतकऱ्यांना विश्वासात न घेता शेतकऱ्यांच्या जमिनीच्या सातबारा उतारावर भूसंपादन म्हणून शेरे मारले आहेत. त्यानंतर त्यावर हरकती घेण्यासाठी नोटीस प्रसिद्ध केली होती. या काळात सात गावातील तब्बल 2 हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी हरकत घेतली होती. त्यावर पुन्हा नोटीस पाठवून सुनवाई घेण्यात आली. यामध्येही शेतकऱ्यांनी आम्हाला विमानतळ प्रकल्प नकोच अशी ठाम भूमिका मांडली आहे.

# तुकोबारायांच्या पालखी सोहळ्याची इंदापुरात जय्यत तयारी

## इंदापूर शहरात जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे रविवारी (29 जून) आगमन होणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

इंदापूर शहरात जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे रविवारी (29 जून) आगमन होणार आहे. जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यानिमित्त इंदापूर नगरपरिषद प्रशासनामार्फत पालखीच्या स्वागताची जय्यत तयारी केली असून उत्तम अशा प्रकारे पूर्वनियोजन करण्यात आले आहे.

पालखी मार्गातील व शहरातील रस्त्यातील खड्डे बुजवणे, पालखी मार्ग तसेच शहरातील सर्व रस्ते यांची स्वच्छता करणे, सर्व सार्वजनिक शौचालये यांची दुरुस्ती तसेच स्वच्छता करणे, पालखी मार्गावरील सर्व अतिक्रमणे काढून घेणे, पालखी मार्गावरील राडारोडाअस्ताव्यस्त पडलेले बांधकाम साहित्य काढून घेणे यासारखी कामे करण्यात येत आहेत. शहरात 13 सार्वजनिक शौचालये असून पालखी कालावधीसाठी निर्मलवारी अंतर्गत अतिरीक्त 1200 मोबाईल टॉयलेट उपलब्ध करण्यात आले आहेत. शहरातील रिंगण सोहळा ते पालखी मुक्कामाचे ठिकाण, परतीचा मार्ग व शहरातील सर्व ठिकाणचे रस्ते, सर्व सार्वजनिक शौचालये, मोबाईल टॉयलेट दिवे दुरुस्त करून चालू करण्यात आले आहेत.

पालखी सोहळ्याच्या अनुषंगाने पाणीपुरवठाचे नियोजन करण्यात आले असून जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेमार्फत पाण्याची तपासणी करण्यात आली आहे. पालखी कालावधीसाठी नगरपरिषदेकडून 10 पिण्याच्या पाण्याच्या टँकरची सोय करण्यात येणार आहे. पालखी तळावर महिलासाठी तात्पुरत्या स्वरुपात 50 क्षमतेचे स्वतंत्र स्नानगृह उभारण्यात आले आहेत.

रयत शिक्षण संस्थेच्या सौ. कस्तुराबाई श्रीपती कदम विद्यालय, इंदापूर यांचे प्रांगणात गोल रिंगण आखणेत आले आहे. रिंगण सोहळ्याचे ठिकाणी पालखी ठेवण्याकरिता मंडप व स्टेजची उभारणी करणेत येत आहे. रिंगणाचे बॅरिकेटिंग करणेत आले आहे. पालखी तळावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असून येणाऱ्या भाविकांना रिंगण सोहळा पाहता यावा म्हणून डिजिटल स्क्रीनची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.



### इंदापूर नगरपालिका 24 तास वारकऱ्यांना सेवा पुरवणार

» नगरपरिषदकडे 1 अग्निशमन वाहन असून पालखी सोहळ्यासोबत 24 तास राहणार असून त्यावर प्रशिक्षित कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नगरपरिषदेमार्फत पालखी आगमनापासून प्रस्थानापर्यंत पालखी सोहळयातील वारक-यांच्या सेवा सुविधासाठी नगरपरिषदने 24 तास दक्षता घेणेसाठी 10 संवर्ग अधिका-यांची व 80 नगरपरिषद कर्मचारी यांची नेमणूक केली आहे. अशी माहिती मुख्याधिकारी रमेश ढगे यांनी दिली.